# मिरा भाईंदर महानगरपालिका
## नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पूर्व),
ता.जि.ठाणे - 401 107. दूरध्वनी : 022-28121455, *E-mail Id :- tp@mbmc.gov.com


जा.क्र :- मनपा/नर/ ४०८/2024-2025 दिनांक :- 0६/05/2024

प्रति,
माहिती व जनसंपर्क अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :-** मौजे नवघर येथिल स.क्र. (जुना) 272 (नविन) 84 हि.क्र. 3पै.,4 या जागेस दिलेल्या बांधकाम परवानगीबाबत.

**संदर्भ :-**
1. आपलेकडील दि.22/04/2025 रोजीचे पत्र. (सोबत - दैनिक नवभारत मधील बातमीचा खुलाश्याबाबत पत्र)
2. अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा भाईंदर यांचे कार्यालय यांचेकडील पत्र क्र. महसुल/कांदळवन/स्थळपाहणी क्र.03/2024, दि.23/04/2024 अन्वयेचे पत्र.
3. महानगरपालिकेकडील पत्र क्र. MBMC/B/2024/APL/00197, दि. 28/03/2024 अन्वयेची बांधकाम परवानगी.

विषयांकित प्रकरणात संदर्भिय पत्र क्र. 01 अन्वये आपण दैनिक नवभारत मधील आलेल्या बातमीचा खुलासा सादर करणेस कळविले आहे. याबाबतचा खुलासा खालील प्रमाणे आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे-नवघर, येथील स.क्र.272 (जुना) 84 (नविन), हि.क्र.4 या जागेत मौजे नवघर स.क्र.272/3पै. या जागेत महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/391/2022-23, दि.04/05/2022 अन्वये दिलेल्या सुधारीत परवानगी मधील सदर प्रस्तावातून वजावट केलेले एकूण अतिक्रमीत क्षेत्र - 106.00 चौ.मी. पैकी 42.00 चौ.मी. या प्रस्तावात सामाविष्ट करुन त्यानुसार सल्लागार अभियंता एकत्रित मौजे नवघर स.क्र.272/3पै. व 4 साठी एकूण क्षेत्र (272/3पै. क्षेत्र 42.00 चौ.मी व 272/4 - क्षेत्र - 4180.00 चौ.मी.) = 4222.00 चौ.मी साठी रहिवास आणि वाणिज्य इमारत 1 (तळ + 1 ते 3 पोडियम + 1 ते 28 + 29 मजले) करीता एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार (UDCPR) बांधकाम मिळणेकरिता विकासक मे. प्रामाणिक होम्सचे पार्टनर श्री. हरिश प्रकाश जैन यांचेतर्फे त्यांचे सल्लागार अभियंता मे. डि. एन. पटेल ॲण्ड असो. यांनी प्रस्ताव सादर केला असता सदर प्रस्तावास संदर्भिय पत्र क्र. 03 अन्वये बांधकाम परवानगी दिलेली आहे.

वरील प्रमाणे विकास परवानगी देताना अमलात असलेले MCZMA कडील सन 2019 चे मंजूर नकाशे, मा. अपर प्रधान, मुख्य संरक्षक कांदळवन यांचेकडील नकाशे तसेच मंजूर व प्रारुप विकास योजना नकाशे यानुसार जागेमध्ये कांदळवन नसल्याने तसेच सदर जमिन बफर क्षेत्राच्या बाहेर स्थित असल्याने सदर उपलब्ध नकाशे / कागदपत्रे यांचे आधारे प्रस्तावाची छाननी करुन प्रस्तावास UDPCR तरतुदीनुसार विकासकास नियमानुसार बांधकाम परवानगी दिलेली आहे.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पूर्व),
ता.जि.ठाणे - 401 107. दूरध्वनी : 022-28121455, *E-mail Id :- tp@mbmc.gov.com

जा.क्र :- मनपा/नर/ ४०१/२०२४-२०२५ दिनांक :-०६/०९/२०२४

तथापि, अपर तहसिलदार यांचेकडील संदर्भिय पत्र क्र. 02 अन्वये दिलेल्या माहितीनुसार सदर जागेवर कांदळवन आहे किंवा कसे? याबाबत MCZMA विभागाकडील अभिप्राय प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास सादर करेपर्यंत विकासकास दिलेल्या बांधकाम परवानगीस पत्र क्र. मनपा/नर/238/2024-25 दि.30/05/2024 अन्वये स्थगीती दिलेली आहे. सदर खुलासा माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.

(पु. म. शिंदे)
सहायक संचालक, नगररचना
मिरा भाईंदर महानगरपालिका